




दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज

• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २७२ •गुरूवार, दि.०१ जानेवारी २०२६ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955







समुद्रासारख्या आठवणी, मावळतीची शांतता गुडबाय २०२५...

## २०२५ चा अस्त... नव्या पहाटेची आशा...



# ठाकरेंच्या सर्व उमेदवारांचे अर्ज बाद करा

## निवडणूक अधिकाऱ्यांकडे भाजपची मोठी मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची काल शेवटची तारीख होती. त्यामुळं आपल्यालाच जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी आणि त्यामुळं आपलाच महापौर व्हावा यासाठी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी वेगवेगळ्या प्रकारे रणनीती वापरुन वाट्टेल तशा युत्या आणि आघाड्या करत किंवा स्वतंत्रपणे लढत उमेदवारी अर्ज दाखल केले. यातून राजकीय पक्षांकडून एकमेकांविरोधात कुरघोड्यांचं राजकारण पाहायला मिळालं. त्यातच



आता भाजपनं निवडणूक अधिकाऱ्यांकडं एक मोठी मागणी केली आहे. त्यानुसार ठाकरेंच्या उमेदवारांचे अर्ज बाद करण्याची विनंती त्यांना करण्यात आली आहे.

नाशिकमध्ये हा प्रकार घडला असून निवडणूक अधिकाऱ्यांकडे भाजपची मोठी मागणी केली आहे. यामध्ये ठाकरेंच्या शिवसेनेच्या उमेदवारांचे अर्ज बाद करण्याची विनंती त्यांना करण्यात आली आहे. या उमेदवारांच्या ए बी फॉर्मवर डिजिटल स्वाक्षरी असल्यानं त्यांचे अर्ज बाद करण्याची मागणी भाजपनं केली आहे. ▶उर्वरित पान २ वर

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे शनिवार रोजी योगिराज महाराज रामगडकर यांचे कीर्तन



**बीड । प्रतिनिधी**


विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील पाचव्या पुण्यतिथी पौष शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प.स्वामी योगिराज महाराज यांचे शनिवार ▶उर्वरित पान २ वर

# भिमा कोरेगाव येथे येणाऱ्या वाहनांना टोलमाफी द्या

## खा.बजरंग सोनवणे यांचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण महाव्यवस्थापकांना पत्र

**केज । प्रतिनिधी**

दि.१ जानेवारी २०२६ रोजी पुणे जिल्ह्यातील ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजयस्तंभ येथे होणाऱ्या मानवंदना कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो अनुयायी व नागरिक दाखल होणार आहेत. या पार्श्वभूमीवर त्या दिवशी राज्यातील सर्व टोल नाक्यांवरून जाणाऱ्या वाहनांना टोलमाफी देण्यात यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे



यांनी केली आहे. याबाबत खा.बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (एमएसआरडीसी) व्यवस्थापकीय संचालक यांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे, भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी बीडसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या ▶ उर्वरित पान २ वर

# आणखी एका न्यायालयीन लढ्यात धनंजय मुंडेंचा विजय!

## धनंजय मुंडेंच्या विधानसभा निवडणुकीतील शपथपत्राविरोधात दाखल केलेली फिर्याद परळी न्यायालयाने फेटाळली

**परळी वै. । प्रतिनिधी**

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांचा आणखी एका न्यायालयीन लढ्यात विजय झाला आहे. विधानसभा निवडणूक २०२४ मधील त्यांच्या उमेदवारी अर्ज सोबत जोडलेल्या शपथपत्रामध्ये उल्लेख केलेल्या माहितीवर आक्षेप घेत लोकप्रतिनिधी अधिनियम कायद्याच्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्याबाबत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी



परळी वैद्यनाथ यांच्या न्यायालयात करुणा शर्मा यांनी फौजदारी कारवाई करण्याबाबत फिर्याद प्रकरण दाखल केले होते. याबाबत आज परळी न्यायालयाने निकाल दिला असून सदर प्रकरणातील सर्व आरोप तथ्यहीन असल्याने ते फेटाळून लावले आहेत.

धनंजय मुंडे यांच्या नामनिर्देशन पत्रामध्ये नमूद माहितीवरून करुणा शर्मा यांनी वेगवेगळे आरोप करत शपथपत्रात खोटी माहिती दिल्याचा आरोप ▶ उर्वरित पान २ वर

# बा विठ्ठला... महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा अबाधित राहू दे - धनंजय मुंडेंचे पंढरीत पांडुरंगाला साकडे

## नववर्षाच्या पूर्वसंध्येला धनंजय मुंडे पंढरपूर येथे पांडुरंगाच्या दर्शनाला श्री संत माधवमामा मठाच्या वास्तूचे धनंजय मुंडे यांच्या हस्ते भूमिपूजन

**पंढरपूर । प्रतिनिधी**

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला श्रीक्षेत्र पंढरपूर येथे जाऊन श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले. उद्या इंग्रजी नवीन वर्ष सुरू होत असून या नवीन वर्षात महाराष्ट्रातील जनतेला सुख समृद्धी नांदू दे यासह महाराष्ट्रातील सलोखा कायम अबाधित राहू दे असे साकडे धनंजय मुंडे यांनी पांडुरंगाच्या चरणी घातले आहे.



याप्रसंगी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर ▶ उर्वरित पान २ वर

# 9 वीत शिकणाऱ्या मुलीने गळफास घेत जीवन संपवले

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील तांबवा येथे एक हृदयद्रावक घटना घडली आहे. केज येथील विद्यालयात इयत्ता नववीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या १४ वर्षीय विद्यार्थिनीने आपल्या राहत्या घरी गळफास घेत आपली जीवनयात्रा संपवली. या घटनेमुळे मोठी हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तनुजा गोविंद चाटे (वय १४ वर्ष) ही रविवारी (दि. २८ डिसेंबर)



घरीच होती. दुपारी तिने आपल्या दोन मजली घराच्या पहिल्या मजल्यावरील खोलीचा दरवाजा आतून बंद करून घेतला. त्यानंतर खोलीतील सीलिंग फॅनला साडीच्या सहाय्याने गळफास लावून जीवन संपवले. घटनेची माहिती मिळताच रविवारी दुपारी ४:३० वाजण्याच्या सुमारास केज पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे, उमेश निकम आणि त्यांच्या ▶उर्वरित पान २ वर

# खरेदीचा बहाणा करून कार लुबाडणारी टोळी उघडकीस



**बीड । प्रतिनिधी**

कार खरेदी करण्याचा बहाणा करून वाहन मालकांची फसवणूक करणारी टोळी बीड शहर पोलिसांनी उघडकीस आणली आहे. या प्रकरणात अमरावती येथील दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांनी कार खरेदीच्या नावाखाली वाहन ताब्यात घेऊन ती परत न करता फसवणूक केल्याचे उघडकिस आले आहे. सचिन आसाराम बोराडे, रा. माळीवेस बारादरी बीड, कडून त्याच्या मालकीची स्विफ्ट डिझायर कार, खरेदी करण्याचा बहाणा करून आरोपींनी सुरुवातीला काही रक्कम ॲडव्हान्स स्वरूपात दिली. उर्वरित पैसे कागदपत्रे तयार करून आणतो, आणि राहिलेले श्रीराम फायनान्स चे सर्व हप्ते भरतो अशी बतावणी ▶ उर्वरित पान २ वर



*सराटी संघर्ष योद्धे मनोज दादा जरांगे पाटील यांना वांगी येथे चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचे निमंत्रण देताना भावी ढेकणमोह पंचायत समिती सदस्य हरिभाऊ शेळके व कार्यकर्ते छायाचित्र दिसत आहेत.*

# परप्रांतीय ऊसतोड मजुरांच्या 2 अल्पवयीन मुलींवर अत्याचार; किराणा दुकानदारासह ट्रॅक्टर चालकाला अटक

**माजलगाव । प्रतिनिधी**

छत्तीसगड राज्यातून बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात ऊसतोडणीसाठी आलेल्या आदिवासी समाजातील दोन मजुरांच्या १३ व १४ वर्षीय अल्पवयीन मुलींवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी ग्रामीण पोलिसांनी तातडीची कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आहे. गणेश राजाभाऊ घाटूळ (किराणा दुकानदार) व अशोक भास्कर पवार (ट्रॅक्टर चालक) अशी



अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. यंदा बीड जिल्ह्यात ऊसतोडणीसाठी परप्रांतीय मजुरांची मोठ्या प्रमाणावर आवक झाली आहे. छत्तीसगडमधील १४ मजुरांची एक टोळी माजलगाव तालुक्यात ऊसतोडणीसाठी दाखल झाली होती. त्यापैकी दोन मजुरांनी स्वयंपाकासाठी मदत व्हावी म्हणून आपल्या दोन अल्पवयीन मुलींनाही सोबत आणले होते. तालुक्यातील रोशनपुरी परिसरात ऊसतोडणीचे काम सुरू असून, हे मजूर मागील दोन महिन्यांपासून मुकादम उद्धव श्रीकिशन तिडके ▶ उर्वरित पान २ वर






# गेवराई येथील कृषी प्रदर्शनाचे आज मठाधिपती शिवाजी महाराज व चेअरमन बाबुराव बोत्रे पाटलांच्या हस्ते होणार उद्घाटन

**गेवराई । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने स्वर्गीय कृषिरत्न गणेशराव बेद्रे स्मृतिप्रीत्यर्थ या प्रदर्शनाचे आयोजन केले असून आज दि १ जानेवारी गुरुवार रोजी दुपारी १:०० वा. महंत शिवाजी महाराज ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी प्रमुख उपस्थितीत माजी मंत्री बदामराव पंडित, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे



कुलगुरू हे उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून युवा नेते बाळराजे पवार यांची विशेष उपस्थिती असणार, प्रमुख पाहुणे म्हणून गेवराईच्या नगराध्यक्ष गीता भाभी पवार, मुख्याधिकारी विक्रम मांडूरगे, जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे, गेवराई चे तहसीलदार संदीप खोमणे , तालुका कृषी सचिन गिरी, आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. मराठवाड्यातील शेतकर्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान वतीने स्वर्गीय कृषिरत्न गणेश बेद्रे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रदर्शनाचे आयोजन केले असून ▶ उर्वरित पान २ वर




## बीडकरांसाठी यंदाचा '३१ डिसेंबर' सुनासुना

# मेटे साहेबांच्या संकल्पनेतील 'संगीत रजनी'ची उणीव...



दरवर्षी ३१ डिसेंबर म्हटलं की, बीडकरांच्या डोळ्यासमोर उभं राहायचं ते लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेबांनी सुरू केलेलं एक वेगळं समीकरण. एका बाजूला व्यसनमुक्तीचा संदेश देणारी भव्य रॅली आणि दुसरीकडे सरत्या वर्षाला निरोप देताना आयोजित केली जाणारी 'संगीत रजनी'. मात्र, यंदा मेटे साहेबांच्या या संकल्पनेतील मुख्य सोहळ्याची उणीव जिल्ह्याला प्रकर्षाने जाणवली असून, बीडकरांसाठी ही सायंकाळ काहीशी सुनसुनी गेली आहे. स्व. मेटे साहेबांची दूरदृष्टी केवळ राजकारणापुरती मर्यादित नव्हती. तरुणांनी व्यसनांच्या आहारी न जाता सुदृढ शरीर आणि निकोप मनाने नवीन वर्षाचे स्वागत करावे, हा त्यांचा मुख्य उद्देश होता. त्यासाठीच त्यांनी '३१ डिसेंबर' रोजी व्यसनमुक्ती रॅलीची परंपरा सुरू केली होती.

या विचाराला आनंदाची जोड देण्यासाठी ते 'संगीत रजनी'चे आयोजन करत असत. यात लावणी, सुगम संगीत आणि विविध कलाकारांच्या सादरीकरणातून बीडकरांना एक कौटुंबिक सांस्कृतिक मेजवानी मिळत असे.

साहेबांच्या पश्चात त्यांच्या पत्नी डॉ. ज्योतीताई मेटे यांनी हा वारसा आणि ही परंपरा पुढे नेण्याचा प्रमाणिक प्रयत्न केला आहे. तरीही, साहेबांचे ते 'व्हिजन', दहा मिनिटात कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्याची त्यांची हातोटी आणि प्रत्येक कार्यकर्त्याला आपलेसे वाटणारे त्यांचे नेतृत्व याची कमतरता आज प्रत्येकाला जाणवत आहे. साहेबांच्या उपस्थितीत जो उत्साह आणि चैतन्य असायचे, त्याची जागा आता आठवणींनी घेतली आहे. मेटे साहेबांसाठी ३१ डिसेंबर हा केवळ सण नव्हता, तर तो सामाजिक बांधिलकी जपण्याचा दिवस होता. हिंदू-मुस्लिम-बौद्ध-ख्रिश्चन अशा सर्व धर्मीयांना एकत्र आणून, 'आपण सारे भारतीय' ही भावना ते या कार्यक्रमांतून रुजवायचे. यापूर्वी मागील कांही वर्ष जेव्हा हा कार्यक्रम साहेबांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय पार पडत आहे, तेव्हा जिल्ह्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात एक मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना बीडचे नागरिक व्यक्त करत आहेत.

साहेबांनी दाखवलेली पाऊलवाट ही यशस्वीतेचा महामार्ग होती. त्यांच्या संकल्पनेतील प्रत्येक कार्यक्रम हा समाजाला दिशा देणारा असायचा, 'संगीत रजनी'च्या मंचावर साहेबांची ती आश्वासक मूर्ती दिसणार नाही, ही सल प्रत्येक बीडकराच्या मनात आहे.



**– अतुल लांगोरे**

# भीमा कोरेगाव शौर्य दिन

## सामाजिक समतेच्या संघर्षाची प्रेरणागाथा

भारतीय समाजाच्या इतिहासात काही घटना केवळ लष्करी विजय किंवा पराभव म्हणून मर्यादित राहत नाहीत, तर त्या सामाजिक परिवर्तनाच्या, आत्मसन्मानाच्या आणि समानतेच्या संघर्षाचे प्रतीक बनतात. १ जानेवारी रोजी साजरा होणारा 'भीमा कोरेगाव शौर्यदिन' ही अशीच एक ऐतिहासिक घटना आहे. १८१८ साली भीमा नदीच्या काठावर घडलेली भीमा कोरेगावची लढाई ही केवळ इंग्रज आणि पेशवाई यांच्यातील संघर्ष नव्हता, तर तो तत्कालीन सामाजिक विषमतेविरुद्ध उभा राहिलेल्या शोषित, वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या आत्मसन्मानाचा लढा होता. म्हणूनच हा दिवस केवळ इतिहासातील एक पान नसून, आजही सामाजिक समतेच्या संघर्षाला दिशा देणारा प्रेरणास्तंभ आहे.

पेशवाईच्या काळात भारतीय समाजावर कडव्या जातिव्यवस्थेचे जाचक ओझे होते. विशेषतः महार, मांग, चांभार यांसारख्या दलित समाजघटकांवर अमानवी निर्बंध लादले गेले होते. सार्वजनिक विहिरी, मंदिरे, शिक्षण, प्रतिष्ठा आणि मानवी हक्क यांपासून त्यांना दूर ठेवण्यात आले होते. अशा स्थितीत पेशवाईविरोधात उभे ठाकलेले महार समाजातील सैनिक इंग्रज सैन्यात सहभागी झाले आणि त्यांनी भीमा कोरेगावच्या रणांगणावर पराक्रम गाजवला. संख्येने कमी असूनही त्यांनी पेशव्यांच्या बलाढ्य सैन्याला रोखले. या विजयाने दलित समाजाला केवळ लष्करी यश मिळाले नाही, तर त्यांनी सामाजिक अपमानाच्या इतिहासाला छेद दिला.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, भीमा कोरेगावची लढाई ही सत्ता, जात आणि प्रतिष्ठा यांच्यातील संघर्षाचे प्रतीक आहे. तत्कालीन सामाजिक रचना ही सत्ताधारी उच्चवर्णीयांच्या बाजूने झुकलेली होती. पेशवाई ही केवळ राजकीय सत्ता नव्हती, तर ती धार्मिक-सामाजिक वर्चस्वाचीही प्रतिनिधी होती. अशा व्यवस्थेविरुद्ध उभा राहणे म्हणजे केवळ युद्ध जिंकणे नव्हे, तर सामाजिक मानसिकतेला आव्हान देणे होते. महार सैनिकांनी हे आव्हान स्वीकारले आणि इतिहासात आपले नाव कोरले.

या घटनेचे महत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले. त्यांनी १ जानेवारी १९२७ रोजी भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला मानवंदना दिली. त्या दिवसापासून भीमा कोरेगाव शौर्यदिनाला सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. डॉ. आंबेडकरांसाठी हा विजय ब्रिटिशांच्या बाजूने मिळालेला लष्करी यश नव्हता, तर तो अस्पृश्यतेविरुद्ध उभ्या राहिलेल्या आत्मसन्मानाचा विजय होता. त्यांनी या घटनेचा उपयोग दलित समाजात स्वाभिमान, संघटन आणि संघर्षाची चेतना निर्माण करण्यासाठी केला.

आजच्या काळात, जेव्हा संविधानिक मूल्ये, सामाजिक समता आणि लोकशाहीवर विविध प्रकारचे आव्हाने येत आहेत, तेव्हा भीमा कोरेगाव शौर्यदिन अधिकच महत्त्वाचा ठरतो. हा दिवस आपल्याला सांगतो की अधिकार सहज मिळत नाहीत; त्यासाठी संघटित संघर्ष करावा लागतो. दलित समाजाचा हा इतिहास केवळ एका समाजापुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण भारतीय लोकशाहीच्या प्रवासाचा भाग आहे.

शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक प्रतिष्ठा या क्षेत्रांत आजही असमानता दिसून येते. भीमा कोरेगावची आठवण ही या असमानतेविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देते. समाजशास्त्रीय दृष्टीने, हा दिवस सामाजिक गतिशीलतेचा (डेलळरश्र चेलळश्रळीं) संदेश देतो. इतिहासात दडपल्या गेलेल्या समाजघटकांनी शिक्षण, चळवळ आणि संविधानाच्या माध्यमातून आपले स्थान बदलू शकते, हे भीमा कोरेगावचे प्रतीक आहे.

म्हणूनच, भीमा कोरेगाव शौर्यदिन साजरा करताना केवळ भूतकाळाचा गौरव न करता वर्तमान आणि भविष्याचा विचार करणे आवश्यक आहे. जातीय द्वेष, सामाजिक बहिष्कार आणि असमानता यांना नकार देत, समतेवर आधारित समाज उभारण्याचा संकल्प करण्याची ही वेळ आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या संविधानिक मूल्यांच्या चौकटीत राहून, लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याची प्रेरणा भीमा कोरेगाव आपल्याला देते.

अखेरीस असे म्हणता येईल की, भीमा कोरेगाव शौर्य दिन हा केवळ एका लढाईचा स्मृतिदिन नाही, तर तो सामाजिक न्यायाच्या दीर्घ संघर्षाचा प्रतीकात्मक उत्सव आहे. हा दिवस आपल्याला इतिहासातून शिकवतो की, अन्याय कितीही खोल रुजलेला असला, तरी संघटित इच्छाशक्ती, आत्मसन्मान आणि समानतेची जाणीव त्याला आव्हान देऊ शकते. म्हणूनच १ जानेवारी हा दिवस शौर्याचा, स्वाभिमानाचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या अखंड प्रवासाचा साक्षीदार ठरतो.



**– डॉ. राजेंद्र बगाटे**

### *सरणारे वर्ष मी...*
### *कवी - मंगेश पाडगावकर*

मी उद्या असणार नाही,
असेल कोणी दूसरे !
मित्रहो, सदैव राहो,
चेहरे तुमचे हासरे........!
झाले असेल चांगले,
किंवा काही वाईटही !
मी माझे काम केले,
नेहमीच असतो राईट मी !
माना अथवा नका मानु,
तुमची माझी नाळ आहे !
भले होवो, बुरे होवो,
मी फक्त 'काळ' आहे....!
उपकारही नका मानु,
आणि दोषही देऊ नका.....!
निरोप माझा घेताना,
गेट पर्यंत ही येऊ नका !
उगवत्याला 'नमस्कार',
हीच रीत येथली !
विसरु नका 'एक वर्ष,
साथ होती आपली !
धुंद असेल जग उद्या,
नव वर्षाच्या स्वागताला !
तुम्ही मला खुशाल विसरा,
दोष माझा प्राक्तनाला !
शिव्या, शाप, लोभ, माया,
यातले नको काही.....!
मी माझे काम केले,
बाकी दूसरे काही नाही !
निघताना 'पुन्हा भेटु',
असे मी म्हणणार नाही !
'वचन' हे कसे देऊ,
जे मी पाळणार नाही......!
मी कोण ? सांगतो
'शुभ आशीष' देऊ द्या,
'सरणारे वर्ष' मी,
आता मला जाऊ द्या........!

**– ॲड. प्रदीप नामदेव चव्हाण**
**रयत सेवा प्रतिष्ठान**

◆ पान १ वरून पुढे...

### ठाकरेंच्या सर्व...

भाजप शहराध्यक्ष सुनील केदार यांनी निवडणूक अधिकाऱ्यांना यासंदर्भात पत्र लिहून ही मागणी केली आहे. त्यामुळं आता भाजपने केलेल्या मागणीवर निवडणूक अधिकारी काय निर्णय घेतात याकडं सर्वांचं लक्ष असेल. निवडणूक आयोगाला लिहिलेल्या पत्रात सुनील केदार म्हणतात, निवडणूक आयोगाच्या नियमानुसार प्रत्येक पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या उमेदवारी अर्जास जोडपत्र -२ (बी फॉर्म) जोडणे बंधनकारक आहे. पण उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या सर्वच उमेदवारांच्या उमेदवारी अर्जास जोडलेल्या जोडपत्र-२ वर डिजिटल स्वाक्षरी करण्यात आली आहे. पण निवडणूक नियमावलीनुसार जोडपत्र -२ वर अधिकृत व मूळ स्वाक्षरी असणं आवश्यक आहे. डिजिटल स्वाक्षरी असलेलं जोडपत्र वैध धरता येत नाही. याद्वारे निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन झाल्यानं ठाकरे गटाच्या सर्व उमेदवारांचे अर्ज तात्काळ रद्द करण्यात यावेत ही विनंती. आज ३१ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या दरम्यान सुनील केदार यांनी हे पत्र निवडणूक अधिकाऱ्यांना दिले आहे.

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ...

दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी काळेगांव ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

### भिमा कोरेगाव....

संख्येने नागरिक प्रवास करणार आहेत. या प्रवासासाठी हजारो वाहने रस्त्यावर उतरल्याने टोल नाक्यांवर मोठी गर्दी होण्याची शक्यता असून त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होऊ शकते. तसेच प्रवाशांवर आर्थिक भारही पडणार आहे. भीमा कोरेगाव मानवंदना कार्यक्रमात नागरिक स्वखुशीने, शांततेत व मोठ्या श्रद्धेने सहभागी होत असतात. या पार्श्वभूमीवर नागरिकांना कोणतीही आर्थिक अडचण येऊ नये, यासाठी १ जानेवारी २०२६ रोजी राज्यातील सर्व टोल नाक्यांवरून जाणाऱ्या वाहनांना

◆ पान १ वरून पुढे...

टोलमाफी देण्यात यावी, अशी मागणी खा.सोनवणे यांनी केली आहे. या निर्णयामुळे जनतेला दिलासा मिळेल, टोल नाक्यांवरील गर्दी कमी होईल आणि एकूणच वाहतूक व्यवस्थापन सुलभ होण्यास मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. यासंदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करण्यात यावेत, अशी अपेक्षाही खा.सोनवणे यांनी प्रशासनाकडे व्यक्त केली आहे.

### आणखी एका...

करत लोकप्रतिनिधी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. याप्रकरणी परळीच्या प्रथमवर्ग न्यायालयात सुनावणी पार पडली, करुणा शर्मा यांनी नोंदवलेला जबाब, वकिलांचा युक्तिवाद यांसह वस्तुस्थिती लक्षात घेत न्यायालयाने करुणा शर्मा यांनी दाखल केलेली फिर्याद फेटाळून लावली आहे. धनंजय मुंडे यांच्या वतीने ॲड. अशोक कवडे यांनी काम पाहिले तसेच ॲड. हरिभाऊ गुट्टे यांनी त्यांना मदत केली. दरम्यान धनंजय मुंडे यांच्या बाजूने न्यायालयाने आणखी निकाल दिला आहे. याआधी देखील कृषी विभागाच्या खरेदी वरून निरनिराळे आरोप करत धनंजय मुंडे यांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेमध्ये देखील कोणतेही तथ्य आढळले नाही आणि ते प्रकरण देखील मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावत तक्रारदाराला उलट दंड लावला होता. नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद निवडणुकीत धनंजय मुंडे यांनी परळीत एकहाती सत्ता कायम राखली, तेव्हा देखील न्यायालयाच्या निकालात आणि जनतेच्या निकालात आपला विजय झाल्याची भावनिक प्रतिक्रिया त्यांनी दिली होती. एका पाठोपाठ धनंजय मुंडे यांच्या विरोधातील प्रकरणांचे निकाल पाहता, या याचिका, खटले किंवा ट्रायल या निव्वळ मुंडेंच्या बदनामीसाठी रचण्यात आल्याचे दिसून येते.

### बा विठ्ठला...

समितीच्या वतीने श्री धनंजय मुंडे यांचा विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, परळी पंचायत समितीचे माजी सभापती बालाजी मुंडे, यांच्यासह पंढरपूर येथील पदाधिकारी आदी उपस्थित होते. दरम्यान बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील संत ज्ञानेश्वरांचे अनुयायी व

◆ पान १ वरून पुढे...

भक्त म्हणून ओळखले जाणारे आचार्य ह. भ. प. अर्जुन महाराज लाड गुरुजी यांच्या पुढाकारातून श्री संत माधव मामा यांच्या नावाने वारकरी व भाविकांच्या सेवेसाठी प्रशस्त मठाची उभारणी करण्यात येत असून या वास्तूच्या कामाचे भूमिपूजन श्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते व संत - महंत आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

### 9 वीत शिकणाऱ्या...

सहकाऱ्यांनी पंचनामा केला. पोलिसांनी तात्काळ मृतदेह खाली उतरवून शवविच्छेदनासाठी केज येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवून दिला. तनुजा ही अवघ्या १४ वर्षांची होती आणि नुकतीच नववीत शिकत होती. इतक्या लहान वयात तिने हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून या घटनेमुळे तांबवा परिसरात शोककळा पसरली आहे.

### खरेदीचा बहाणा...

केली, असे सांगून त्यांनी कार ताब्यात घेतली. मात्र, वाहनाच्या कागदपत्रांवर कोणतीही कायदेशीर सही करण्यात आली नाही तसेच उर्वरित रक्कमही दिली गेली नाही. त्यानंतर सदरील कार परत न करता आरोपी फरार झाले. या संदर्भात फिर्यादीकडून तक्रार दाखल झाल्यानंतर बीड शहर पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. तपासादरम्यान अमरावती येथील गुड्डू खान रेहमत खान वय ४० वर्षे, रा. बिस्मिल्ला नगर, लाल खडी रोड, अमरावती आणि अब्दुल राजीक अब्दुल सादिक वय ४३ वर्षे, रा. इदगाह गेट, हैदरपूर, अमरावती या दोघांना अटक करण्यात आली आहे. प्राथमिक तपासात सदरील कारचा वापर गोवंश चोरीसाठी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. सदरील कार अमरावती ग्रामीण येथील बेनवडा पोलीस स्टेशन हद्दीत जप्त करण्यात आलेली असून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे. या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की वाहन विक्री करताना अत्यंत दक्षता घ्यावी. केवळ जास्त किंमत देत आहे म्हणून कोणाच्याही ताब्यात वाहन देऊ नये. मध्यस्थामार्फत व्यवहार केला जात असला तरी समोरच्या व्यक्तीची संपूर्ण खात्री पटल्याशिवाय वाहन सुपूर्द करू नये. संपूर्ण रक्कम प्राप्त होऊन वाहनाची कायदेशीर नोंदणी व हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय वाहन विक्री करू नये, अन्यथा सदरील वाहन परत

◆ पान १ वरून पुढे...

मिळण्याची शक्यता कमी असून ते गुन्हेगारी कृत्यासाठी वापरले जाण्याचा धोका असतो. ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, पोलीस जमादार बबन जाधव व पोलीस अंमलदार संजय राठोड यांनी केली आहे.

### परप्रांतीय ऊसतोड....

यांच्यामार्फत काम करत होते. दि. २४ डिसेंबर रोजी मजूर ऊसतोडणीसाठी शेतात गेले असताना, झोपडीत या दोन मुली एकट्याच असल्याची संधी साधून गावातील किराणा दुकानदार व त्याचा मित्र ट्रॅक्टर चालक यांनी त्यांना बाहेर नेऊन शेतात अत्याचार केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर दोन्ही मुली भीतीच्या छायेत होत्या. अखेर दि. २८ डिसेंबर रोजी एका मुलीने आपल्या वडिलांना संपूर्ण प्रकार सांगितला. यानंतर दि. २९ डिसेंबर रोजी मुलीच्या वडिलांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रार मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पांडव यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन्ही आरोपींना अटक केली. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी करत आहेत.

### गेवराई येथील...

प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन ओंकार साखर कारखाना यांचा विशेष सहभाग या प्रदर्शनात असणार आहे. कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहेत. तरी या प्रदर्शनाचा तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने संयोजक कृषिभूषण महेश बेदरे, स्वागताध्यक्ष बप्पासाहेब तळेकर, निमंत्रक शिनु भाऊ बेद्रे, कार्याध्यक्ष अजय दाभाडे भाउसाहेब शिंदे, स्वागत समिती प्रमुख, मान्यवर स्वागत समिती प्रमुख, राजेंद्र बेदरे, नियोजन समिती प्रमुख राजेंद्र मोटे, व्यवस्थापन समिती प्रमुख राजाराम पवार, प्रसिद्धी प्रमुख भागवत जाधव, विनोद पौळ, चर्चासत्र समितीप्रमुख सतीश केसभट, पशुप्रदर्शन समिती प्रमुख संभाजी जाधव आदींनी केले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

### महाराष्ट्र लोकसेवा...

उमेदवारांना जेवणाचा डबा /अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन येण्यास परवानगी देण्यात येत आहे. दोन पेपरच्या मधल्या वेळेमध्ये उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास सक्त मनाई आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेले परीक्षेचे केवळ आवश्यक साहित्य उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील, तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेशपत्रासोबतच त्यांचे स्वतः चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हींग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणतेही एक ओळखपत्र व त्याची एक छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. उमेदवारांना त्यांचे परीक्षा उपकेंद्रावर सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहणेबाबत याव्दारे सूचित करण्यात आले आहे. सकाळी १०.३० वाजे नंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

### माजलगावच्या बुलढाणा...

बीड जिल्ह्यात व महाराष्ट्रातील अनेक बँका ठेविदारांचे पैसे घेऊन पोबारा केला असल्याचे वाघ अनेकांवर गुन्हे दाखल झाले असल्याचे दिसून आलेले आहे व ज्ञान राधा व माजलगाव च्या सामाजिक परिवर्तन व इतर अनेक बँकांवर गुन्हे दाखल झालेले आहेत व अनेक बँकांचे अध्यक्ष व संचालक मंडळ कोणी जेलमध्ये आहे तर कोणी फरार आहेत त्याच धर्तीवर माजलगाव ची बुलढाणा बँक ही पळून जाणार की काय या भीतीने ठेवीदार प्रचंड काळजीत असून आपल्या ठेवी काढण्यासाठी गेल्या तीन ते चार

◆ पान ४ वरून पुढे...

दिवसापासून धावपळ करीत आहेत.

### बीड शहर...

उमेदवारांनी बीड शहर विकास आघाडी स्थापन करून गटनेते पदी खुर्शीद आलम यांची एकमुखाने निवड केली. या संदर्भात बुधवार (दि.३१) रोजी राष्ट्रवादी भवन येथे बैठक पार पडली. या बैठकीत आ.संदिप क्षीरसागर, माजी.आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष उल्हास गिराम यांची प्रमुख उपस्थिती होती. गटनेते पदी निवडून आल्या बद्दल खुर्शीद आलम यांचे तसेच सर्व निर्वाचित नगर परिषद सदस्यांचे आ.संदिप क्षीरसागर माजी.आ.सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रोहन गलांडे...

लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यास सुरुवात केली आहे पत्र देण्यात आले आहे तसेच चिंचोली माळी येथील कर्मवीर विद्यालयाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी होती त्यांचा चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे त्यांची पुढील कार्यवाही उच्च शिक्षण संस्था अधिकारी यांच्या कडून करणार आहे असे रोहन गलांडे यांनी म्हटले आहे.तसेच केज तालुक्यातील महाडीबीटी योजनेची रक्कम देण्यास सुरुवात झाली आहे त्यांचे पत्र तालुक्याचा अहवालासह १० जानेवारी रोजी मिळणार आहे तसेच चिंचोली माळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नव्या व जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी कीती निधी खर्च केला त्यांची चौकशी केली असुन खुप

◆ पान ४ वरून पुढे...

मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार उघडकीस आला आहे तरी पुढील कार्यवाही लवकरच सुरू करण्यात येणार आहे तसेच चिंचोली माळी येथील गायरान परीसरातील सौरऊर्जा प्रकल्प काम १५ जानेवारी रोजी सुरू करण्यात येईल असे केज तहसीलदार यांनी म्हटले आहे तसेच मुख्य मागणी श्री संत नामदेव महाराज सभागृह ते नागबेट वस्ती अतिक्रमण हटविण्याचे काम व रस्ता व नालीचे काम काही कालावधीनंतर होईल असे पत्र प्राप्त झाले आहे तसेच काही मागण्या वर कार्यवाही सुरू आहे तरी रोहन गलांडे यांच्या सर्व मागण्या प्रशासनाने मान्य केल्या आहेत.तसेच रोहन गलांडे यांनी प्रसारमाध्यमांना संपादक, पत्रकार साथिदार अमरण उपोषणाला भेट देणाऱ्या सर्वांचे आभार मानले आहेत तसेच विरोध, बदनामी करणाऱ्यावर मी बोलावे ऐवढे विरोध त्या लायक नाही कारण मी त्यांना झेपलो नाही त्यांनी बदनामी केली माझे आंदोलन मोडून काढण्यासाठी मंत्र्यांची मदत घ्यावी लागली असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

### जयसिंग सोळंके...

करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष गावचे सरपंच भागवत गोंडे प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श गावचे मा सरपंच ज्ञानेश्वर माऊली सुरवसे व गावातील तरुण युवकांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे प्रस्तावित शाळेचे मुख्याध्यापक गडदे सर यांनी केले. यावेळी पत्रकार रामेश्वर गोंडे यांनी आपले विचार मांडताना सांगितले की आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन चांगल्या मोठ्या पदावर जाऊन आपल्या आई-वडिलांचे व शाळेचे,गुरुजनांचे,गावाचे नाव रोशन केले पाहिजे,शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना आपला थोडा हातभार लाभावा यासाठी आपण भैया साहेबांचा वाढदिवसानिमित्त

◆ पान ४ वरून पुढे...

तुम्हाला या शालेय साहित्यांचा वाटप केले जात आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्ञानेश्वर माऊली सुरवसे यांनी सांगितले की आपल्या मतदारसंघाला कार्य कुशल आमदार प्रकाश दादा सोळंके व सभापती जयसिंग भैया सोळंके या काका पुतण्यांचा महाराष्ट्रात इतरांनी आदर्श घ्यावा.आम्ही लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप सुरुवात आपल्या याच शाळेतून केली होती त्यावेळी मा आमदार मोहन काका सोळंके व युवा नेते जयसिंग भैया सोळंके यांच्या शुभ हस्ते केली होती.त्यावेळेस भैय्यासाहेबांनी विद्यार्थ्यांच्या शालेय साहित्यासाठी एक लक्ष रुपयाचा चेक याच शाळेत दिला होता. चेअरमन महादेव गोंडे यांनी सोळंके परिवार शेतकऱ्यांच्या शेतीसाठी जलसिंचनासाठी मतदार संघाच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध असतात त्यांनी आपल्या मतदारसंघात अनेक जलप्रकल्प आणले आणल्याचे त्यांनी सांगितले. शालेय समितीचे सदस्य दिनकर गोंडे यांनी आपल्या गावातील शाळेतील विद्यार्थ्यांसाठी असे कार्यक्रम दरवर्षी घेत आहात तो खरच कौतुकास्पद आहे.यापुढेही आपल्या शाळेसाठी व विद्यार्थ्यांसाठी सहकार्य करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी गावचे सरपंच भागवत गोंडे उपसरपंच गोविंद गोंडे चेअरमन महादेव गोंडे,ग्राप सदस्य साहेबराव गोंडे,यादव गोंडे,दादासाहेब गोंडे,रत्न सुंदर बँकेचे शाखा व्यवस्थापक मसुराम गोंडे,पत्रकार रामेश्वर गोंडे,पत्रकार अशोक फपाळ,युवा नेते मुकुंद गोंडे,युवा नेते कृष्णा गोंडे, अक्षय गोंडे बाळू गोंडे, शाळेचे मुख्याध्यापक तात्याराव गडदे सर, आर एस शेंडगे सर,ए ए इंगळे सर, आर एम भोज सर,आर बी काळे सर, ए एच दिवे मॅडम आधी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक आर एस शेंडगे सर यांनी केले, उपस्थित यांचे आभार मुख्याध्यापक गडदे सर यांनी मांनले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# कला महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमधून कलाकार निर्माण होतील : माजी आ. भीमराव धोंडे

## आत्मविश्वास आणि सातत्य हाच यशाचा खरा मार्ग - सुप्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी

**आष्टी । प्रतिनिधी**

राज्यस्तरीय गंगाई बाबाजी रौप्य कला महोत्सवाच्या माध्यमातून आष्टी सारख्या ग्रामीण भागातील युवकांमधून कलाकार निर्माण होण्यास मदत होईल, आई- वडिलांच्या त्यागाची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी सातत्याने प्रगती करावी असे प्रतिपादन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले.

आष्टी येथील भगवान महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय गंगाई बाबाजी रौप्य कला महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते. राज्यस्तरीय कला रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने सकाळी आष्टी शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर सिनेअभिनेत्री हेमांगी कवी,सौ. दमयंतीताई धोंडे, युवानेते अजयदादा धोंडे,सौ. अक्षताताई धोंडे,अभयराजे धोंडे,चेअरमन राजुकाका धोंडे, जि.प.चे माजी सदस्य सतिश शिंदे, माजी सभापती नियामत बेग, किशोरनाना हंबर्डे, धैर्यशील थोरवे, ड.रत्नदीप निकाळजे, रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, हरिभाऊ जंजिरे, सरपंच अशोक मुळे, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, आण्णासाहेब



भोसले, ह.भ.प. दिनकर महाराज तांदळे,पत्रकार भगवान राऊत,उत्तम बोडखे, दिलीप काळे,सरपंच सावता ससाणे, संतोषभैया चव्हाण, अश्ताक शेख,स्वामी सानप,अज्जुभाई शेख,प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य सुरेश बोडखे,भाग्यश्री राऊत, सरपंच दादासाहेब जगताप, प्रा.अल्लाउदिन सय्यद, युवराज वायभासे, आदेश निमोणकर संस्थेचे सर्व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना अभिनेत्री हेमांगी कवी यांनी सांगितले की,थोर महापुरुषामुळे आपण येथे आहोत दुष्काळी आणि एवढ्या ग्रामीण भागात माजी आ. भीमराव धोंडे यांनी शिक्षणाची गंगा आणली ही बाब खरोखरच कौतुकास्पद आहे. माझ्या अभिनयापेक्षा जास्त वर्षे त्यांचे राजकीय व सामाजिक कार्य आहे. दिवसेंदिवस मुलींची संख्या वाढत आहे. मी अगदी सामान्य घरातून आले आहे. अगोदर आई वडीलांचा विश्वास संपादन केला त्यामुळे मी जिवनात यशस्वी झाले. विद्यार्थ्यांनो शिक्षण अगोदर पुर्ण करा. अभिनयाची आवड असेल तर आत्मविश्वास हवा. आपल्या हुशारीचा वापर योग्य ठिकाणी करा. कला क्षेत्रात भरपूर वाव आहे. माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमात सौ. दमयंतीताई धोंडे यांचे मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सामाजिक, राजकीय,शैक्षणिक क्षेत्रासह चित्रपट क्षेत्रात काम केले ही बाब चांगली आहे. आष्टी हा ग्रामीण भाग आहे परंतु मला शहरात आल्यासारखे वाटले एवढा विकास केल्याचे दिसत आहे.

यावेळी अभिनेत्री हेमांगी कवी यांना यावर्षीचा कला क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी हेमांगी कवी यांनी फु बाई फु मधील अनेक विनोदी संवाद सांगुन उपस्थितांचे मनोरंजन केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी सांगितले की, आता हा फक्त महोत्सव राहिला नाही तर राज्यस्तरीय कला रौप्य महोत्सव बनला आहे.गंगाई बाबाजी महोत्सवाचे रुपांतर वटवृक्षात झाले आहे. संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आपल्या आईवडीलांच्या स्मृती प्रित्यर्थ हा महोत्सव सुरू केला. चांगला समाज घडविण्याच्या उद्देशाने हा महोत्सव सुरू केला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुत्रसंचलन प्रा. डॉ. आप्पासाहेब टाळके यांनी केले. उपस्थितांचे आभार सुरेश फुले यांनी मानले.प्रा. डॉ. अनिल हजारे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. कार्यक्रमास विद्यार्थी विद्यार्थीनी पालक व आष्टी परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिंबागणेश येथे हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरु

## बेलेश्वर संस्थान मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या शुभहस्ते उद्घाटन

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

नाफेड कृषी पणन मंडळाच्या किमान आधारभूत किंमत (चडझ) योजनेंतर्गत लिंबागणेश (ता. बीड) येथे नागनाथ बहुउद्देशीय सेवा सहकारी संस्था, खंडाळा यांच्या वतीने शासकीय हमीभाव सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचा शुभारंभ मंगळवार (दि. ३०) रोजी श्री गुरू ईश्वर भारती बाबा बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या शुभहस्ते झाला. या खरेदी केंद्रामुळे लिंबागणेश पंचक्रोशीतील



शेतकऱ्यांना सोयाबीन विक्रीसाठी सुरक्षित, पारदर्शक आणि हमीभावाची विश्वासार्ह सुविधा उपलब्ध होणार आहे. यावर्षी सोयाबीनसाठी प्रतिक्विंटल ५,३२८ इतका हमीभाव जाहीर करण्यात आला असून, सध्याच्या बाजारभावापेक्षा अधिक दर मिळणार असल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. हमीभाव योजनेमुळे शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळेल, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, माजी सरपंच बाळासाहेब मुळे, बाळकृष्ण थोरात, सुरेश निर्मळ, सुधीर वाणी, प्रदीप चौरे, श्रीनिवास चौरे, चव्हाण सर तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. खरेदी प्रक्रिया व नोंदणी: नोंदणी क्रमांकानुसार शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे सूचना पाठवून खरेदी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. खरेदीसाठी सोयाबीन स्वच्छ, वाळवलेले व गुणवत्तापूर्ण असणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे-

चालू वर्षाची ई-पीक नोंद असलेला डिजिटल ७/१२ व ८-अ उतारा- आधारकार्ड, राष्ट्रीयीकृत बँकेच्या पासबुकची झेरॉक्स, ही कागदपत्रे घेऊन शेतकऱ्यांनी स्वतः केंद्रावर उपस्थित राहून ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

ऊशिरा का होईना, हमीभाव केंद्रे सुरू-शेतकऱ्यांना दिलासा : डॉ. गणेश ढवळे- राज्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांना योग्य दर मिळावा यासाठी अखेर जिल्ह्यात हमीभाव खरेदी केंद्रांना सुरुवात झाली आहे. राज्य शासनाच्या आधारभूत किंमत योजनेंतर्गत २०२५-२६ हंगामासाठी केंद्रे सुरू झाली असली, तरी उशिरा प्रारंभ झाल्याने काही नाराजी होती. मात्र आता योग्य दराने विक्रीची संधी उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. सर्व शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. गणेश ढवळे यांनी केले.

# बालविवाह निर्मुलनासाठी प्रतिज्ञा घेण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

शासनाकडून बालविवाह मुक्त भारत पोर्टल सुरु करण्यात आले असून हे सर्व नागरिकांसाठी खुले आहे. तरी बालविवाह मुक्त भारत पोर्टलवर जाऊन https://stopchildmarriage.wcd.gov.ळप या लिंकवर क्लिक करुन बालविवाह निर्मुलनाची प्रतिज्ञा घ्यावी व प्रतिज्ञा घेतल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन या मोहिमेमध्ये नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी.एम. यांनी केले आहे.

जिल्ह्यात दि.१६ ऑक्टोबर २०२५ ते दि.२६ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये बालविवाह मुक्त भारत अभियान १०० दिवस जिल्हा महिला व बाल विकास विभागाकडुन राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जालना जिल्ह्यात बालविवाहाचे समुळ उच्चाटन व्हावे या अनुषंगाने प्रशासनाकडुन जनजागृती करण्यात येत आहे. बालविवाह थांबविण्याकरीता २४ तास १०९८ ही चाईल्ड हेल्पलाईन सेवा सुरु आहे. ासाठी सर्व स्तरावरुन सर्वांनी बालविवाह मुक्त भारत करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.


## जाहिर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज २००४/२०२५**

**शेख नादानबी विरूध्द निरंक**

अर्जदार - **१. शेख नादानबी भ्र. शेख महेबुब, वय - ६७ वर्षे, धंदा - घरकाम, रा. कुर्ला ता. जि. बीड, २. शेख अजिम पि. शेख महेबुब, वय - ५० वर्षे, धंदा मजुरी रा. सदर ३. शेख अल्लाउददीन पि. शेख महेबुब, वय - ४८ वर्षे, धंदा मजुरी, रा. सदर, ४. शेख मैनोददीन पि. महेबुब, वय - ४४ वर्षे, धंदा मजुरी, रा. सदर, ५. सय्यद तमीज भ्र. सय्यद गुलाब, वय - ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. ताकडगांव ता. गेवराई जि. बीड**

विरुध्द निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत शेख महेबुब शेख दादामिया** यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत **शेख महेबुब शेख दादामिया यांचा मृत्यु दिनांक १२/१०/२०१२** रोजी झाला आहे. वरील अर्जदारा क्र. १ ते ५ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत शेख महेबुब शेख दादामिया यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क. १ ते ५ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू **मयत शेख महेबुब शेख दादामिया** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २९/१२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.
**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १०/०२/२०२६ आहे.**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


# रहेमान सय्यद यांचा गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक पुरस्काराने गौरव



**कडा । प्रतिनिधी**

कडा येथील सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यदअली सय्यद यांना गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या निस्वार्थ समाजसेवेची दखल घेत त्यांना शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित भगवान महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित रौप्य महोत्सवातील यंदाचा राज्यस्तरीय गंगाई-बाबाजी आर्दश समाजसेवक पुरस्कार आज दि.३१ डिसेंबर २०२५ बुधवार रोजी आष्टी येथे पुरस्कार वितरण सोहळ्यात मा.आ.भिमराव धोंडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी सौ. दमयंतीताई धोंडे, डॉ.अजय दादा धोंडे,सौ.अक्षताताई धोंडे, नियामत बेग,पत्रकार उत्तम बोडखे, प्रा.वाघ सर,सेवानिवृत्त पीएसआय अन्सार शेख, राजु काका धोंडे, संतोष चव्हाण,कासिम सय्यद, सईद शेख , इम्रान पठाण,नईम शेख ,साद शेख, तसेच पत्रकार बांधवासह आदी मान्यवर उपस्थित होते. रहेमान सय्यद यांचे हे योगदान सामाजिक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# 53 व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचा समारोप व बक्षीस वितरण

## बाल वैज्ञानिक देतील देशाच्या प्रगतीत योगदान- जिल्हाधिकारी स्वामी

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधन वृत्ती आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांची गरज आहे. त्यात सहभागी होणारे हे बाल वैज्ञानिक देशाची प्रगती साध्य करण्यासाठी मोठे योगदान देऊ शकतात, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज गणोरी ता. फुलंब्री येथे केले. ५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन जिल्हा परिषद प्रशाला गणोरी, तालुका फुलंब्री येथे पार पडले. समारोप व पारितोषिक वितरण समारंभाला जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची प्रमुख उपस्थिती



होती. या प्रदर्शनास शिक्षणाधिकारी माध्यमिक श्रीमती अश्विनी लाठकर, उपशिक्षणाधिकारी श्रीमती सीमा म्हेत्रे खैरनार, गटशिक्षणाधिकारी क्रांती धसवाडीकर, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी राजेश महाजन, जिल्हा विज्ञान पर्यवेक्षक दिलीप सिरसाठ, श्रीमती सुनीता वाघ तसेच माध्यमिक शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचारी, फुलंब्री तालुक्यातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी प्राथमिक, माध्यमिक व शिक्षक गटातील एकूण ७० प्रयोगाचे निरीक्षण त्यांनी केले. विज्ञान प्रदर्शनाची आठवण चिरकाल राहावी यासाठी माध्यमिक शिक्षण विभाग व भारतीय डाक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान प्रदर्शनाचा लोगो असलेले विशेष डाक तिकीट यावेळी प्रदर्शित करण्यात आले.


## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १४९/२०२५**

**शेख गुलाब बाबामिया विरुध्द मुख्या.न.प.बीड**

**पहा, १.शेख गुलाब बाबामिया, रा.इस्मालपुरा, बीड ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मदीनाबी बाबामिया शेख यांचा दिनांक १८/०६/२०१४ रोजी** मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **खंडाळा** ता. बीड येथील मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **खंडाळा** ता. जि. बीड येथील मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २९/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख २९/०१/२०२६ ही आहे.**

शिक्का | (स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १५२/२०२५**

**दिनेश जनार्दन पवार विरुध्द ग्रा.प.कार्या.खंडाळा**

**पहा, १. दिनेश जनार्दन पवार, रा.खंडाळा, ता.जि. बीड (ह.मु. चेंबुर मुंबई)**

उपरोक्त प्रमाणे मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **जनार्दन यादवराव पवार यांचा दिनांक १९/०७/२०२४ रोजी** मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **खंडाळा** ता. बीड येथील मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **खंडाळा** ता. जि. बीड येथील मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/०१/२०२६ ही आहे.**

शिक्का | (स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १५३/२०२५**

**विजय निवृत्ती पवार विरुध्द ग्रा.प.कार्या.खंडाळा**

**पहा,**

**१. विजय निवृत्ती पवार , रा.खंडाळा, ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **हौसाबाई निवृत्ती पवार यांचा दिनांक १७/१०/२०१७ रोजी** मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **खंडाळा** ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **खंडाळा** ता. जि. बीड येथील मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख २०/०१/२०२६ ही आहे.**

शिक्का | (स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**

e-mail -tahsildar georai2@gmail.com

**दिनांक २८.०९.२०२५**

दुरध्वनी क्र. ०२४४७-२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि-

प्रती,

१ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा

२. ग्राम महसूल अधीकारी कुंभेजळगाव

विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८१)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५

२. **अर्जदार भरत नानासाहेब लेंडगूळे, रा. कुंभेजळगाव ता गेवराई जि बीड** यांचा अर्ज दिनांक १०.०९.२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०१ अर्जदार **भरत नानासाहेब लेंडगूळे, रा. कुंभेजळगाव ता गेवराई जि बीड यांचा मूलगा लेंडगूळे सूरज भरत यांचा जन्म दिनांक २३.११.२००७ रोजी झालेला** आहे. काही कारणास्तव ग्राम पंचायत कार्यालय कुंभेजळगाव येथे नोंद झाली नाही, करीता जन्म नोंद आदेशाची मागणी या कार्यालयास केलेली आहे.

संदर्भ क्र ०१ चे शासन निर्णय दिनांक १२.०३.२०२५ मध्ये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो२५२६/ ईऑ९ ९१ १८१)/प्र.क्र. २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो. स्टें गेवराई/ पाचेगाव / जयराम तांडा यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्म ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी **कुंभेजळगाव** यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का | (स्वाक्षरीत) तालुका दंडाधिकारी, गेवराई

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरूवार, दि. ०१ जानेवारी २०२६ ● पान ४

## माजलगावच्या बुलढाणा अर्बन बँकेच्या डुबन्याच्या आफवेने ठेवीदारांत घबराट



माजलगाव । प्रतिनिधी

बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी बुलढाणा या बँकेच्या माजलगाव शाखेत ठेवीदारात बँक बुडण्याच्या अफवा सर्व बीड जिल्ह्यात पसरल्याने धारूर व वडवणी शाखेत ठेवीदारांनी आपल्या ठेवी सुरक्षित आहेत का नाही हे बघत ठेवी काढून घेण्यासाठी प्रचंड गर्दी निर्माण केली असून बुलढाणा अर्पण को-ऑपरेटिव्ह बँक वडवणी आणि धारूर या पळून जाणार अशी सर्व बीड जिल्ह्यात चर्चा असल्याने धारूर आणि वडवणी बुलढाणा अर्बन बँकेच्या शाखेत ठेवीदारांनी आपल्या ठेवी काढून घेण्यासाठी तोबा गर्दी व गोंधळ घातला होता याचे लोन आता बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव बँकेच्या माजलगाव शाखेपर्यंत पोहोचले असून माजलगाव तालुक्यातील बुलढाणा बँकेतील ठेविधानात घबराट निर्माण झाले असून आपल्या कष्टाच्या पैशाची सुरक्षितता ठेवीदारांना वाटत नसून आज दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी पासून व त्याच्या अगोदरही दोन-तीन दिवसापासून ठेवीदारांनी आपल्या ठेवी सुरक्षित आहेत का नाही हे जाणून घेण्यासाठी व आपल्या ठेवी परत काढण्यासाठी प्रचंड गर्दी निर्माण झाली आहे गेल्या दोन-तीन दिवसापासून बुलढाणा बँक पळून जाते का काय या आठवणी बीड जिल्ह्यात व संपूर्ण महाराष्ट्रात बुलढाणा बँकेच्या ४०० ते ५०० च्या जवळपास शाखा आहेत व या बँकेत महाराष्ट्रातील सर्वच ठेवीदारांच्या ठिकठिकाणी करोडो रुपयांच्या ठेवी आहेत व आतापर्यंत ▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट ब संयुक्त पूर्व परीक्षा




बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट व अराजत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ दिनांक ४ जानेवारी, २०२५ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकुण १६ उपकेंद्रामधून सकाळी ११.०० ते १२.०० या वेळेत एक सत्रात घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी एकूण ४६५९ उमेदवार बसलेले असून सदर परिक्षा सुरळीत पार पाडणेकरीता १६ उपकेंद्रप्रमुख, ३३ मदतनीस, ७२ पर्यवेक्षक, २३० समवेक्षक असे एकूण ३५१ अधिकारी कर्मचारी यांची जिल्हा प्रशासनाव्दारे नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना दिनांक २४.१२.२०२५ रोजी जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी बीड तथा जिल्हा केंद्राप्रमुख यांनी सदर परिक्षेचे अनुषंगाने प्रशिक्षण दिले. परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणाताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परीसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे. मा. आयोगाच्या सूचनेनुसार सदर परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांचेकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू व अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाता येणार नाही. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड शहर विकास आघाडीच्या गटनेतेपदी खुर्शीद आलम

### निर्वाचित नगरसेवकांनी एकमुखाने केली निवड



बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष यांच्या निर्वाचित सदस्यांकडून बीड शहर विकास आघाडीची स्थापना करण्यात आली असुन, गटनेते पदी खुर्शीद आलम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. पक्षाशी एकनिष्ठ आणि विकासासाठी संघर्षशील असलेले कार्यकर्ते खुर्शीद आलम यांना यामाध्यमातुन न्याय मिळाला आहे. बीड नगरपरिषद निवडणुक २०२५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे हे दोन्ही पक्ष एकत्र मिळून लढले होते. त्यामध्ये या आघाडीकडून १३ उमेदवार निवडून आले आहेत. निवडून आलेल्या ▶ उर्वरित पान २ वर





*पवनचक्की प्रकल्पात पाते घेऊन जाणाऱ्या ट्रकमुळे झालेल्या अपघातानंतर आता त्या भागात उद्रेक निर्माण झाला असून पवनचक्की यार्डातील वाहनेच अज्ञात व्यक्तीने पेटवून दिली आहेत. वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी शिवारात पवनचक्की उभारल्या जात आहेत. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी बांधकाम साहित्याचे वहन करणाऱ्या वाहनांच्या भरधाव वेगाचे सोमवारी रात्री दोन बळी गेले. गेल्या दीड महिन्यात अशा वाहनांखाली तीन जीव गेल्याचे समोर आले आहे. दरम्यान, सोमवारी रात्रीच्या घटनेनंतर अज्ञात व्यक्तीने प्रकल्पाच्या यार्डात शिरून वाहनांची जाळपोळ केली आहे. यामध्ये कोट्यवधीचे नुकसान झाले आहे. अपघात व जाळपोळीचे दोन स्वतंत्र गुन्हे नोंदविण्याची प्रक्रिया येरमाळा पोलिसांत मंगळवारी रात्रीपर्यंत सुरूच होती. अपघातानंतर त्या भागात परिस्थिती उद्रेकी बनली आहे. पवनचक्की मधील आर्थिक तडजोड गुन्हेगारी वाढवत असून बीड, धाराशिव जिल्ह्यात पवनचक्की ऊर्जा निर्माण करायचं सोडून गुन्हे आणि गुन्हेगारच निर्माण करत असल्याचं दिसत आहे..*

## निर्लेखित साहित्याचा लिलाव

बीड । प्रतिनिधी

जिल्हा व सत्र न्यायालय, बीड या कार्यालयातील निर्लेखीत करावयाच्या फर्निचर / जडवस्तु तसेच निररूपयोगी वस्तुंची जाहिर लिलाव पध्दतीने विक्री करावयाची आहे. हा जाहिर लिलाव दि. ०८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता नवीन जिल्हा न्यायालय इमारतीच्या आवारात (प्रवेशव्दारा समोर) ठेवण्यात आलेला आहे. तसेच विक्री करावयाचे साहित्य / जडवस्तु दिनांक ०७ जानेवारी २०२६ रोजी कार्यालयीन वेळेत पाहता येईल. इच्छूक खरेदीदारांनी इतर सविस्तर अटी व शर्तीच्या माहिती करीता रूम नं. ३०९, लेखा व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, बीड येथे संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक यांनी केले आहे.

## ॲनिमिया मुक्त गाव करण्यासाठी मोरेवाडीच्या माता-भगिनींची केली वैद्यकीय तपासणी

### स्वच्छता अभियान अन् महिलांना डस्टबिनचे वाटप



वडवणी । प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री पंचायत अभियान १७/०९/२०२५ रोजी सुरू झाले,जे ग्रामीण विकास आणि लोकसहभागातून ग्राम विकासाला चालना देण्यासाठी राबवले जात आहे. हे अभियान ग्रामपंचायतच्या कार्यक्षमता वाढवण्यासाठी एक पुरस्कार आधारित मोहीम आहे ग्रामपंचायतींना त्यांच्या कामगिरी नुसार प्रोत्साहित करून त्यांची कार्यक्षमता वाढवणे त्यांना स्पर्धात्मक वातावरणातून नवीन ऊर्जा देणे शासकीय योजनांचे प्रभावी अंमलबजावणी करणे लोकांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबवले गेले आहे. वडवणी तालुक्यातील मोरेवाडी या गावाने अनेमिया मुक्त गाव या विशेष उपक्रमांतर्गत गावातील सर्व महिलांचे वैद्यकीय तपासणी केली आहे. तसेच गावात स्वच्छता मोहीम राबवून एक आगळावेगळा संदेश सर्व गावांना दिलेला आहे. यानंतर गावातील महिलांना डस्टबिनची वाटप करून आरोग्य स्वच्छते विषयी सर्वांनी माहिती देण्यात आली. यावेळी सरपंच लहु यशवंत काळे, उपसरपंच किसकिंदा सुरेश मोरे, सदस्य सुरेश लक्ष्मण धनवट, सदस्य दत्ता रामभाऊ सोनट्टके,ग्रामपंचायत अधिकारी मोमीन ए. पि., मार्गदर्शक राधाकिशन मोरे, मार्गदर्शक सुरेश आप्पा मोरे,मार्गदर्शक परमेश्वर आगलावे, दत्ता नानवटे अंकुश काळे, बाळासाहेब काळे,युवा मित्रा परिवार,लहे गुट्टे मॅडम अन त्यांची सर्व टीम गावातील सर्व माता भगिनी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रोहन गलांडे पाटील यांच्या अमरण उपोषणाला यश !

### प्रशासनाने सर्वच मागण्या केल्या मान्य !



केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील पत्रकार, संपादक समाजसेवक रोहन गलांडे पाटील यांनी १३ दिवस अमरण उपोषण केले व त्यांच्या मागण्या केज प्रशासनाने,प्रशासनाचा भाग तहसीलदार, गटविकास अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, कृषी अधिकारी, ग्रामसडक योजना अधिकारी यांनी मान्य केल्या आहेत तसेच गावात दुःखत घटना घडली त्यामुळे उपोषण मागे घेतले या विषयी सविस्तर वृत्त असे की त्यांच्या मागणीनुसार चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम २० जानेवारी रोजी सुरू करण्यात येणार आहे असे पत्र त्यांना देण्यात आले आहे तसेच केज तालुक्यातील विहीर व गायगोठा, घरकुल योजनेचे हप्त्ये ▶▶ उर्वरित पान २ वर

## प्राजक्ता ताई डोंगरे बीड यांची अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या मराठवाडा विभागीय अध्यक्ष पदी निवड

### स्वातंत्र्य सैनिक प्रदीप पाटील खंडापुरकर बाबा राष्ट्रीय अध्यक्ष



बीड । प्रतिनिधी

बीड येथील सामाजिक कार्यकर्त्या प्राजक्ता ताई डोंगरे यांची अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या मराठवाडा विभागीय अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे,त्यांच्याकडे बीड, जालना आणी संभाजीनगर जिल्ह्याचा पदभार देण्यात आला आहे.

महाराष्ट्र प्रदेश मुख्य कार्याध्यक्ष विनोद आप्पा इंगोले यांच्या बीड येथील रामकृष्ण सदन विद्यानगर पश्चिम निवासस्थानी झालेल्या बैठकीत प्राजक्ता ताई यांना राष्ट्रीय अध्यक्ष स्वातंत्र्य सैनिक प्रदीप पाटील खंडापुरकर बाबा यांनी नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार केला. विनोद आप्पा इंगोले यांनी प्राजक्ता ताई यांना छत्रपति शिवाजी महाराज यांची प्रतिमा देऊन त्यांना सन्मानित केले,या वेळेस बीड जिल्हाध्यक्ष बालाजी इंगोले,सौ.मोनीका ताई इंगोले सरपंच (वरवटी / आहेर धानोरा ता. जि. बीड), धाराशिव जिल्हाध्यक्ष विनोद सावंत, लातुर जिल्हाध्यक्ष नागेश जाधव, विवेक पवार, श्रावण रावणकुळे, बीड जिल्हाध्यक्ष अंबाजोगाई विभाग जयश्री ताई गवळी, बीड जिल्हा कार्यअध्यक्ष परमेश्वर बप्पासाहेब कवचट उपस्थित होते.

## जयसिंग सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त चिंचोटी जिल्हा परीषद शाळेत शालेय साहित्य वाटप



वडवणी । प्रतिनिधी

माजलगाव मतदार संघाचे युवा नेतृत्व जयसिंग भैय्या सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त चिंचोटी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते रजिस्टर,पेन,पेन्सिल,खोडरबर, शॉपनर आदी शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले. आमदार प्रकाश दादा सोळंके व जयसिंग भैय्या सोळंके यांची काका पुतण्यांची जोडी महाराष्ट्रात आदर्श घ्यावा आशी सासल्याचे मत यावेळी आदर्श गावचे मा सरपंच तथा प्रगतशील युवा शेतकरी ज्ञानेश्वर माऊली सुरवसे यांनी आपले मत व्यक्त केले.

सविस्तर वृत्त असे की गेली सात वर्षे झाली जयसिंग भैया सोळुंके युवा मंच चिंचोटी यांच्यावतीने बीड जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती व लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे व्हा चेअरमन जयसिंग भैय्या सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याच्या वाटपाचा उपक्रम चालू आहे.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शालेय साहित्याचे वाटप ▶▶ उर्वरित पान २ वर



*हिंदू परंपरेतील अत्यंत पुण्यदायी अशी माता नर्मदा परिक्रमा यशस्वीरीत्या पूर्ण करून गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांनी दि. ३० डिसेंबर रोजी श्री क्षेत्र नारायण गड येथे मंगल व प्रेरणादायी आगमन केले. या पार्श्वभूमीवर बुधवारी भागवत एकादशीच्या दिवशी, गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांची भेट घेऊन नर्मदा परिक्रमा पूर्णत्वाच्या मंगल निमित्ताने भक्तिभावाने स्वागत व दर्शन लोकप्रिय, आ. विजयसिंह राजे पंडित यांच्या समवेत मा. जि . सदस्य गणपत आप्पा डोईफोडे, मोहन डोईफोडे, सचिन नरनाळे, शंकर कदम आदी मान्यवर उपस्थित होते या प्रसंगी दर्शन घेण्याचे भाग्य लाभले.*